रयत शिक्षण संस्थेचे,

# दहिवडी कॉलेज दहिवडी

## ता. माण जि.सातारा

## भारतरत्न डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम जयंती

# ‘वाचन प्रेरणा दिवस’

**बुधवार दि.१५ ऑक्टोबर २०२५ वेळ सकाळी.११ . वा.स्थळ:सांस्कृतिक सभागृह**

## अहवाल

महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग, मराठी विभाग, हिंदी विभाग, इंग्रजी विभाग, एन.एस.एस व एन.सी.सी यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दिनांक १५ आक्टोंबर २०२५ रोजी ११ :०० वाजता महावियालात मा.डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्ताने वाचन प्रेरणा दिवस साजरा करण्यात आला. यावेळी वडूज येथील सद्गुरू शिक्षण संस्थेचे चेअरमन मा. श्री जनार्दन देरेकर याचे व्याख्यानाचे आयोजन केले होते. यावेळी श्री. जनार्दन देरेकर यांनी " मा.डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्याविषयी माहिती सांगून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच ते सामाजिक कार्य करीत असणाऱ्या विविध उपक्रमाची माहिती विद्यार्थ्यांना अवगत करून दिली.

यावेळी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य यांनी विद्यार्थ्यांना डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या विविध ग्रंथसंपदा आणि ते का वाचले पाहिजे या संदर्भात मार्गदर्शन केले. तसेच या बरोबरच वाचन प्रेरण दिनाच्या निमिताने संविधान : उद्देशिका, मुलभूत अधिकार व कर्तव्य यातील मजकुराचे सामुदायिक वाचन करण्यात आले. यावेळी इंग्रजी विभागाचे प्रा. पी.वाय कांबळे यांनी पाहुण्यांचा परिचय व प्रास्ताविक करून दिले.तसेच या आभार प्रा. व्ही.एस.वाघेरे ग्रंथपाल यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मराठी विभाग प्रमुख डॉ मीरा देठे, प्रवीण भोसले व अनुसया इमडे यांनी परिश्रम घेतले या कार्यक्रमास मराठी, हिंदी आणि इंग्रजी विभागातील ११० विद्यार्थी उपस्थित होते.

ग्रंथपाल
दहिवडी कॉलेज, दहिवडी
ता. माण, जि. सातारा.

DAHIWADI COLLEGE, DAHIWADI
LIBRARY
TAL MAN DIST SATARA

प्र.प्राचार्य
दहिवडी कॉलेज, दहिवडी
ता. माण, जि. सातारा